मोटार अपघात दावा क्र.१३०/२०२४
जोहरा वि. रोहिकुमार व ईतर
नि.क्र.३६

<u>**अर्जदाराकरिता पुढील सरतपास विधीज्ञ श्री.एस.के.पटेल यांच्या वतीने शपथेवर सुरू-**</u>

१. साक्षीदाराने प्रथम खबर अहवाल, घटनास्थळ पंचनामा, जखमी प्रमाणपत्र, वाहन निरीक्षण अहवाल (2), दोषारोपपत्र, छातीचा स्कॅन अहवाल, पोटाचा स्कॅन अहवाल आणि एमआरआय अहवाल कागदपत्रे दाखल केली. सबब, त्यांना **<u>नि.क्र.३७ ते नि.क्र.४५</u>** देण्यात येते.

<u>**गैरअर्जदार क्र.३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.दिवाण यांच्या वतीने**</u>

२. त्या दिवशी मी आणि माझा पती हैद्राबादहून येत होतो. आम्ही रात्री २.०० वाजता हैद्राबाद येथून निघालो. हे म्हणण खरे नाही की, सदरचा अपघात हा कार चालकाच्या चुकीमुळे घडला. हे म्हणण खरे नाही की, कार चालक हा रात्री झोपलेला नसल्यामुळे सदरचा अपघात घडला. हे म्हणण खरे नाही की, सदरचा अपघात हा दोन्ही वाहन चालकाच्या चुकीमुळे घडला असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणण खरे नाही की, सदर अपघातास कार चालकच जबाबदार आहे.

३. अपघातानंतर मी सहयाद्री हॉस्पीटल येथे भरती होते व त्यानंतर मी बाहयरुग्ण म्हणून डॉ. घुले यांच्याकडे उपचार घेतला. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील सर्व जखमा दुरूस्त झाल्या आणि कुठलाच त्रास नाही. हे म्हणणे खरे नाही की, औषधपाण्याकरीता रू.१,५०,०००/- खर्च झाल्याचे मी खोटे सांगत आहे. शपथपत्रात दर्शविलेले माझे उत्पन्न रू.३०,०००/- दरमहा गृहित धरण्यात यावे ही बाब दाव्यात लिहीली नाही. हे म्हणणे खरे नाही की, या जखमामुळे माझे आर्थिक व शारिरिक कोणतेच नुकसान झाले नाही.

<u>**गैरअर्जदार क्र.६ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.डोईजोडे यांच्या वतीने**</u>

४. हे म्हणणे खरे नाही की, डॉक्टर घुले यांच्याकडून मी खोटे अपंगत्वाचे प्रमाणपत्र घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातात कार चालक सुध्दा जबाबदार असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील जखमा पूर्णपणे दुरूस्त झाल्या आहेत आणि मला कुठलाच त्रास नाही. माझ्या वयाचा

दाखला दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वय ६० वर्ष आहे. माझे वय ४७ वर्षे असल्याबाबत कागदपत्र दाखल केले नाही. आधारकार्डची प्रत दाखल करू शकते.

**गैरअर्जदार क्र.४ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.ए.एच. सय्यद  यांच्या वतीने**

५. पुकारा केला असता गैरहजर, उलट तपास नाही.

**गैरअर्जदार क्र.१ व २ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.पी.पी. चलवाड यांच्या वतीने**

६. पुकारा केला असता गैरहजर, उलट तपास नाही.

**गैरअर्जदार क्र.५ विरूध्द- एकतर्फा.**
**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.
स्वाक्षरित/-
(साजिद आरिफ सैय्यद)

दि.१३.०७.२०२६

जिल्हा न्यायाधीश–४ व
सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
लातूर.